महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:एमआयएस-०१२०/सी.आर.०९/२०२०/मा.तं. दिनांक- २९ नोव्हेंबर, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- प्रशासकीय वैद्यकीय अधिकारी (होमिओपॅथी), गट अ-अर्जातील दाव्याच्या अनुषंगाने अनुभव प्रमाणपत्र सादर करण्याबाबत**

**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ३६/२०२१, दिनांक १२ ऑगस्ट, २०२१**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रशासकीय वैद्यकीय अधिकारी (होमिओपॅथी) गट-अ या पदासाठी दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीस अनुसरुन विषयांकित पदासाठी ज्या उमेदवारांनी आयोगास अर्ज सादर केला आहे, अशा उमेदवारांना अर्जासोबत कागदपत्रे/ प्रमाणपत्रे अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. तथापि, सदर कागदपत्रे /प्रमाणपत्रे यामध्ये अनुभव प्रमाणपत्र अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने अर्ज केलेल्या उमेदवारांकडून अनुभव प्रमाणपत्र सादर करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे. यास्तव, प्रस्तुत पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांना बाह्यदुव्याद्वारे अनुभव प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. अनुभव प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' अंतर्गत 'Upload Documents' या मेनूमध्ये दिनांक ३ डिसेंबर, २०२१ रोजी २०.०० वाजेपर्यंत उपलब्ध असेल. विहित कालावधीत सदर बाह्यदुव्याद्वारे अनुभव प्रमाणपत्र सादर केलेल्या उमेदवारांचा प्रस्तुत पदाच्या निवड प्रक्रियेसाठी विचार केला जाईल, याची संबधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३. अनुभव प्रमाणपत्राचा विहित नमुना आयोगाच्या संकेतस्थळावरील 'DOWNLOADS' या सदरामध्ये उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

४. अनुभव प्रमाणपत्र सादर करण्यात कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर किंवा support-online@mpsc.gov.in या ईमेलवरुन आवश्यक तांत्रिक मदत प्राप्त करुन घेता येईल.

ठिकाण- मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग